**Publication:** Punya Nagari

**Page:** 4

**Date:** April 23

# GARWARE LAUNCHES HYOSUNG SUPERBIKES

## दक्षिण कोरियातील सुपर बाईक भारतात

▌नवी दिल्ली/वृत्तसंस्था



देशातील तरुणाईला असलेले सुपरबाईकचे वेड पाहून दक्षिण कोरियातील प्रमुख ऑटोमोबाईल कंपनी एस अँण्ड टी मोटर्सने भारतीय बाजारात ६५० आणि ७०० सीसी इंजिन क्षमतेच्या दोन सुपर मोटरबाईक सादर केल्या आहेत. त्यांची नावे अनुक्रमे जीटी ६५० व एसटी ७ अशी आहेत. भारतात सुपरबाईक सादर करण्यासाठी या कंपनीने येथील गरवारे बेस्टरेटेक लिमिटेडची ऑटोमोबाईल सहयोगी कंपनी गरवारे मोटर्स लिमिटेड सोबत भागीदारी केली आहे. या कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक दिया गरवारे यांच्या हस्ते दोन्ही सुपरबाईकचे भारतात अनावरण करण्यात आले. एकाच रंगातील जीटी ६५० मॉडेलची किंमत ४.७५ लाख रुपये, तर दोन रंगातील सुपरबाईकची किंमत ४.९० लाख रुपये आहे. तसेच एसटी ७ ची किंमत ५.६९ लाख रुपये ठेवण्यात आली आहे. सध्या या सुपरबाईकसाठी नोंदणी सुरू असून जून महिन्यापासून विक्री सुरू होणार आहे.